JAWAHAR MEDICAL FOUNDATION'S
A.C.P.M. MEDICAL COLLEGE & HOSPITAL
Email : deanacpm@gmail.com
acpmmcdhule@gmail.com
website : www.jmfacpm.com
Sakri Road, Dhule - 424001 (Maharashtra)
Ph.No.: 02562 - 276317,18,19 Mob. 8686585839

**Dr.Vijay Patitl receving Corona Yoddha Award from Aavaaj Samrat TV :**



**Dr. Yatin Wagh received Maharashtra Award-2019 from My FM**



# माय एफएमतर्फे डॉ. यतीन वाघ यांना पुरस्कार;७० उद्योजकांचा गौरव

प्रतिनिधी | धुळे

माय एफएमतर्फे नाशिक येथे माय महाराष्ट्र अवॉर्ड वितरण कार्यक्रम झाला. या वेळी सत्तरहून अधिक यशस्वी उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शहरातील श्री विघ्नहर्ता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. यतीन वाघ यांना एक्सलन्स इन हार्ट सर्जरी इन नॉर्थ महाराष्ट्र हा पुरस्कार देण्यात आला.

नाशिक येथील द सोर्स एट सुला येथे हा कार्यक्रम झाला. या वेळी अभिनेता गुलशन ग्रोव्हर, माय एफएमचे सीओओ राहुल नामजोशी, रिजनल बिझनेस हेड सौरभ वाडेकर यांच्या हस्ते उद्योजकांचा सत्कार करण्यात आला. त्यात शून्यापासून सुरुवात करून यशस्वी उद्योजक झालेल्यांचा समावेश होता. धुळे येथील श्री विघ्नहर्ता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. यतीन वाघ यांना एक्सलन्स इन हार्ट सर्जरी इन नॉर्थ महाराष्ट्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार घेतल्यानंतर उद्योजकांनी मनोगत व्यक्त करत माय एफएमचे आभार मानले. ज्यांना पुरस्कार मिळाला त्यांची जिद्द व स्वतःवरचा विश्वास हा समाजासाठी मोलाचा ठरू शकतो. त्यामुळे हा पुरस्कार महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा असल्याचे मत पुरस्कारार्थींनी व्यक्त केले. सोहळ्याच्या सुरुवातीला वी कंपनीच्या डान्सर्सनी गणेशवंदना व नृत्य सादर केले. प्रल्हाद आचार्य यांनी भावनात्मक पद्धतीने भारतीय एकतेचे वर्णन सावलीच्या माध्यमातून सादर केले. माय एफएमचे आरजे दर्शना आणि आरजे प्रेषित यांनी सूत्रसंचालन केले.



DEAN
A.C.P.M.MEDICAL COLLEGE & HOSPITAL
DHULE

Email : deanacpm@gmail.com
acpmmcdhule@gmail.com
website : www.jmfacpm.com
Sakri Road, Dhule - 424001 (Maharashtra)
Ph.No.: 02562 - 276317,18,19 Mob. 8686585839

**Dr.Nitin Kulkarni receving Corona Warrior Award from IMA, Dhule**




**Maharata Kranti Morcha Appreciating JMF'S ACPMMC & Hospital:**

दिव्य मराठी धुळे सिटी 24-04-2021

**प्रोत्साहन** • मराठा क्रांती मोर्चातर्फे उपक्रम, वर्षभरापासून काम करणाऱ्यांचा शिवप्रतिमा देत सत्कार

# जवाहर मेडिकलमध्ये कोरोना योद्ध्यांचा सत्कार

**प्रतिनिधी** | धुळे

कोविड संकटात जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयातील कर्मचारी दिवसरात्र कार्यरत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत मराठा क्रांती मोर्चातर्फे फाउंडेशनच्या डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, संगीता पाटील यांचा शिवप्रतिमा भेट देण्यात येऊन सत्कार करण्यात आला.



जवाहर मेडिकल फाउंडेशनमध्ये कोरोना योद्ध्यांचा सत्कार करताना मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी.

शहरातील जवाहर फाउंडेशनमध्ये कोरोनाबाधितांवर उपचार करण्यात येत आहे. त्यात शहर, तालुका, जिल्हा आणि परजिल्ह्यातील रूग्णांचा समावेश आहे. बाधितांवर उपचार करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने मराठा क्रांती मोर्चातर्फे सत्कार करण्यात आला. या वेळी मराठा क्रांती मोर्चाचे कार्याध्यक्ष प्रदीप जाधव यांनी संस्थेच्या कामाचे कौतुक केले. सचिव निंबा मराठे यांनी आमदार कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर मेडिकल फाउंडेशनची पूर्ण टीम दिवसरात्र राबत असल्याचा उल्लेख केला. या वेळी डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील यांचा शिवप्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. मराठा क्रांती मोर्चाचे कार्याध्यक्ष प्रदीप जाधव, सचिव निंबा मराठे, खजिनदार विरेंद्र मोरे, सुधाकर बेंद्रे, अशोक सुडके, राहुल गायकवाड, विनोद जगताप, रवींद्र शिंदे, अर्जुन पाटील, संदीप शिंदे, संदीप पाटोळे, उल्हास यादव, आबासाहेब कदम, गिरीश चव्हाण, प्रकाश चव्हाण, श्याम रायगुडे, श्याम निरगुडे, डॉ. संजय पाटील, चंद्रकांत थोरात, विनोद जगताप, निंबा मराठे, राकेश काकुस्ते, विवेक रवंदळे आदी उपस्थित होते. निंबा मराठे यांनी प्रास्ताविक केले. जवाहर मेडिकल फाउंडेशनचे जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे यांनी आभार मानले.

JMF'S A.C.P.M. MEDICAL COLLEGE & HOSPITAL * DHULE *

DEAN
A.C.P.M.MEDICAL COLLEGE & HOSPITAL
DHULE

JAWAHAR MEDICAL FOUNDATION'S
A.C.P.M. MEDICAL COLLEGE & HOSPITAL
Email : deanacpm@gmail.com
acpmmcdhule@gmail.com
website : www.jmfacpm.com
Sakri Road, Dhule - 424001 (Maharashtra)
Ph.No.: 02562 - 276317,18,19 Mob. 8686585839

**Honourable Superdentent Police Appreciating Corona Warriors of JMF'S ACPMMC & Hospital:**

खान्देश खबर
व्हॉटस्अपवर अंक : ९९२३१०७७०७

# डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी हेच खरे देवदूत -चिन्मय पंडित

## जवाहर मेडिकल फौंडेशनच्या कोविड सेंटरला भेट देऊन पहाणी



**धुळे ★खान्देश खबर वृत्त★**

कोविडच्या कठीण काळात डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी हे रुग्णांना देत असलेली सेवा खरोखर कौतुकास्पद आहे. हे सर्व डॉक्टर्स खरे देवदूत आहेत असे मत पोलीस अधीक्षक चिन्मय पंडित यांनी व्यक्त केले. जवाहर मेडिकल फौंडेशनच्या डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरला दिलेल्या भेटीत ते बोलत होते.

यावेळी चिन्मय पंडित यांनी कॉरोनाग्रस्त रुग्णांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. जवाहर मेडिकल फाऊंडेशन कोविड काळात करत असलेले काम हे अद्वितीय असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

शुक्रवारी अचानक पोलीस अधीक्षक चिन्मय पंडित यांनी जवाहर मेडिकल फाऊंडेशनच्या डिसीएचसी सेंटरला भेट दिली. याप्रसंगी डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

मागील दीड महिन्यांपासून जवाहर मेडिकल फाऊंडेशनने १ हजारांहून अधिक रुग्णांवर यशस्वीपणे उपचार केल्याची माहिती डॉ. ममता पाटील यांनी दिली. डॉ. विजय पाटील यांनीही कोविडच्या दुसऱ्या लाटेत एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल निस्वार्थपणे सेवा देत आहे. हॉस्पिटलमध्ये एकूण कोविडच्या रुग्णांसाठी २५० बेड उपलब्ध आहेत. आयसीयूत २५ हून अधिक रुग्णांवर उपचार सुरू आहेत अशी माहिती दिली. रुग्णसेवा करण्यासाठी जवाहर मेडिकल फाऊंडेशन कटिबद्ध असून उत्तमोत्तम सेवा देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही डॉ.पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, चिन्मय पंडित यांनी कोरोना वॉर्ड, विलगीकरण कक्षाला भेट देत रुग्णांना धीर दिला.

### स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

*पोलीस अधीक्षक चिन्मय पंडित यांनी स्वच्छता कर्मचारी विजय धारु याची आवर्जून भेट घेत त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. आयसीयूत काम करणारा अतुल जिरे याच्या कामाचेही त्यांनी भरभरून कौतुक केले. या दोघांसमवेत त्यांनी आवर्जून फोटो काढला.*

कोविडशी लढण्यासाठी पोलीस प्रशासन आपल्या सोबत असल्याचे ते म्हणाले. आरोग्य कर्मचारी, डॉक्टर्स यांना सर्वोतोपरी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. डॉक्टर्स हे ईश्वराचे रूप असून त्यांच्या रुपाने ईश्वर तुमच्या कायम मदतीला असल्याचे ते म्हणाले. यावेळी रुग्णांनीही जवाहर मेडिकलविषयी चांगल्या भावना व्यक्त केल्या. उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच टीम उत्तम कार्य करीत असल्याचे ते म्हणाले.

याप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर पवार, डॉ. तुषार भट, डॉ. रोहन कुलकर्णी, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते उपस्थित होते.

**Honourable Maharashtra Congress President & MLA Appreciating Corona Warriors of JMF'S ACPMMC & Hospital:**




M.C.P.M. MEDICAL COLLEGE & HOSPITAL, JMF'S A.C.P.M. MEDICAL COLLEGE & HOSPITAL ★DHULE★

DEAN
A.C.P.M.MEDICAL COLLEGE & HOSPITAL
DHULE